जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2024
सकाळ



कोल्हापूर : डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे. शेजारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. प्रकाश पवार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, विजयमाला देसाई.

# महासत्ता होण्यासाठी तांत्रिक नावीन्यता आवश्यक : डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे

## डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमाला

**■ सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २५ : तांत्रिक नावीन्यता अतिशय जागरूकतेने राबविण्याचे धोरण स्वीकारणारे देशच महासत्ता म्हणून पुढे येऊ शकतात. त्यामुळे भारतामध्ये तांत्रिक नावीन्यता निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाच्या निवृत्त प्राध्यापिका डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'महासत्तांचा उदय व अस्त' या विषयावर डॉ. सहस्त्रबुध्दे यांनी विचार मांडले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाल्या, 'अमेरिका महासत्ता म्हणून पुढे येऊन कामे करीत असला तरी भारत, रशिया आणि चीन या देशांचा भविष्यकालीन महासत्ता म्हणून उदय होत आहे. उच्च तंत्रज्ञान आणि सातत्याने नावीन्याचा ध्यास घेणारे देशच महासत्ता होऊ शकतात, हे अमेरिकेच्या उदाहरणावरून लक्षात घ्यावे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'चीन आणि रशियाच्या भौगोलिक परिस्थितीपेक्षा भारताची भौगोलिक परिस्थिती उजवी आहे. आंतरराष्ट्रीय धोरणाच्या अभ्यासाची मोठी संधी विद्यार्थ्यांना सध्या उपलब्ध आहे.'

यावेळी विजयमाला देसाई, ज्येष्ठ राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, 'सकाळ'चे सल्लागार संपादक श्रीराम पवार, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, डॉ. भारती पाटील आदी उपस्थित होते. अधिविभाग प्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. अक्षय जहागीरदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले.

26 JUN 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महासत्ता होण्यासाठी तांत्रिक नाविन्यता स्वीकारावी

- राज्यशास्त्र अभ्यासक डॉ. उत्तरा सहस्त्रबुध्दे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

तांत्रिक नाविन्यता अतिशय जागरूकतेने राबविण्याचे धोरण स्वीकारणारे देशच महासत्ता म्हणून पुढे येऊ शकतात. त्यामुळे भारतामध्ये तांत्रिक नाविन्यता निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन राज्यशास्त्रच्या अभ्यासक डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'महासत्तांचा उदय व अस्त' या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना डॉ. उत्तरा सहस्त्रबुध्दे.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाल्या, कोणत्याही देशाचे ध्येय, उद्दीष्ट गाठण्यासाठी त्या देशाची लष्करी आणि आर्थिक क्षमता वाढविणे आवश्यक असते. ध्येय आणि क्षमता यांची सांगड म्हणजे त्या-त्या देशाची सत्ता होय. एकविसाव्या शतकामध्ये तीन मोठ्या सत्तांचा उदय होण्यास सुरूवात झाली. यामध्ये प्रामुख्याने रशिया, भारत आणि चीन हे देश. चीन हा देश महासत्ता होईल. रशिया, चीन आणि भारत या देशांचा विचार करताना नकाशाकडे पाहिले तर एका अर्थाने आशियाचा उदय होत आहे. अमेरिका महासत्ता म्हणून पुढे येऊन कामे करीत असला तरी भारत, रशिया आणि चीन या देशांचा भविष्यकालीन महासत्ता म्हणून उदय होत आहे.

कुलगुरू डॉ.शिर्के म्हणाले, महासत्ता देशाचे स्वप्न साकारण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्था आणि युवा वर्गावर आहे. चीन आणि रशियाच्या भौगोलिक परिस्थितीपेक्षा भारताची भौगोलिक परिस्थिती उजवी आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. अक्षय जहागीरदार यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले. यावेळी विजयमाला देसाई, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, दशरथ पारेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2024
लोकमत

# देशात तांत्रिक नावीन्यता धोरण स्वीकारणे गरजेचे

## डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : तांत्रिक नावीन्यता अतिशय जागरूकतेने राबविण्याचे धोरण स्वीकारणारे देशच महासत्ता म्हणून पुढे येऊ शकतात. त्यामुळे, भारतामध्ये तांत्रिक नावीन्यता निर्माण होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाच्या निवृत्त प्राध्यापिका डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या राज्यशास्त्र अधिविभागामार्फत आयोजित डॉ. अंजली पाटील स्मृती व्याख्यानमालेत महासत्तांचा उदय व अस्त या विषयावर त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. सहस्त्रबुद्धे म्हणाल्या, कोणत्याही देशाचे ध्येय, उद्दिष्ट गाठण्यासाठी त्या देशाची लष्करी, आर्थिक क्षमता वाढविणे आवश्यक असते. एखाद्या देशाची फक्त आर्थिक क्षमता चांगली असूनही सक्षम लष्करी सामर्थ्य नसेल तर तो देश महासत्ता म्हणून ओळखला जाऊ शकत नाही. इंग्लंड, फ्रान्स एकोणिसाव्या शतकातील मध्यापासून युरोपातील मोठे देश होते. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धामुळे त्यांची आर्थिक क्षमता खचली. लष्करी सामर्थ्य युद्धकाळात टिकवून न ठेवल्यामुळे त्यांची महासत्ता ही ओळख टिकू शकली नाही. अमेरिका महासत्ता म्हणून पुढे येऊन कामे करीत असला तरी भारत, रशिया आणि चीन या देशांचा भविष्यकालीन महासत्ता म्हणून उदय होत आहे. डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत केले. डॉ. नेहा वाडेकर यांनी परिचय करून दिला. अक्षय जहागीरदार यांनी सूत्रसंचालन, डॉ. जयश्री कांबळे यांनी आभार मानले. यावेळी विजयमाला देसाई, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. भारती पाटील, दशरथ पारेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2024
पुढारी

# विद्यापीठात आज कुस्ती संकुलाचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त बुधवार, दि. २६ रोजी सकाळी ११ वाजता क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल येथे नवीन कुस्ती संकुलाचा उद्घाटन समारंभ होणार आहे. हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांच्याहस्ते व कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यावेळी हिंदकेसरी विनोद चौगुले, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2024
लोकमत

# कुस्ती संकुलाचे आज उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक कुस्ती संकुलाचे उद्घाटन आज बुधवारी सकाळी ११ वाजता हिंदकेसरी दीनानाथसिंह यांच्या हस्ते होणार आहे.

कुलगुरु डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाला प्र कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, हिंदकेसरी विनोद दादू चौगुले, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर व महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. एन.सी.सी. भवनच्या मागील बाजूस कुस्ती संकुलाची इमारत उभी करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील कुस्ती संकुलाचे आज उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कुस्ती संकुलाचे उद्घाटन राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीनिमित्त हिंदकेसरी दिनानाथ सिंह यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम बुधवारी, २६ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, हिंदकेसरी विनोद दादू चौगुले, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. यावेळी उपस्थित राहावे, असे आवाहन क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2024
तरुण भारत

# शाहू जयंतीनिमित्त विद्यापीठात विविध कार्यक्रम

कोल्हापूर: राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमा पूजन येईल. राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये महाराजांना अभिवादन होईल. सकाळी ११ वाजता क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल परिसरातील नूतन कुस्ती संकुलाचे उद्घाटन हिंदकेसरी दिनानाथ सिंह यांच्या हस्ते होईल. दुपारी १ वाजता ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. रमेश जाधव यांचे राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात व्याख्यान होईल. तरी, या कार्यक्रमांना सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठातर्फे केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2024
सकाळ

# राजर्षी शाहू जयंतीनिमित्त विद्यापीठात आज कार्यक्रम

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती निमित्त उद्या (बुधवारी) शिवाजी विद्यापीठातर्फे विविध कार्यक्रम होणार आहेत.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी साडेदहा वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होईल. राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये महाराजांना अभिवादन होईल. सकाळी अकरा वाजता क्रीडा महर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल परिसरात नव्याने उभारलेल्या विद्यापीठ कुस्ती संकुलाचे उद्घाटन हिंदकेसरी दीनानाथ सिंह यांच्या हस्ते करण्यात येईल. हिंदकेसरी विनोद दादू चौगुले, महाराष्ट्र केसरी विष्णू जोशीलकर, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील प्रमुख उपस्थित असतील. दुपारी एक वाजता ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. रमेश जाधव यांचे व्याख्यान विद्यापीठाच्या राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात आहे. जयंतीच्या पूर्वसंध्येला मुख्य इमारतीला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

## राजर्षी शाहूंचे नाव कुस्ती संकुलाला द्यावे

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कुस्तीला पाठबळ दिले. त्यांच्या जयंतीप्रसंगी कुस्ती संकुलाचे उदघाटन होणार आहे. कुस्तीमध्ये करिअर करणाऱ्या विद्यापीठ, महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळणार आहे. त्यांना सरावदेखील करता येणार आहे. या संकुलाला राजर्षी शाहूंचे नाव द्यावे, अशी मागणी होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

26 JUN 2024
पुढारी

# राजर्षी शाहू जयंतीनिमित्त विद्यापीठात आज विविध कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. यात व्याख्यान, कुस्ती संकुलाचे उद्‌घाटन यांचा समावेश आहे.

बुधवारी सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल. त्यानंतर राजर्षी शाहू संशोधन केंद्रामध्ये महाराजांना अभिवादन करण्यात येणार आहे. दुपारी १ वाजता ज्येष्ठ शाहू संशोधक डॉ. रमेश जाधव यांचे विशेष व्याख्यान राजर्षी शाहू (सिनेट) सभागृहात आयोजित केले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

26 JUN 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



राजर्षी छत्रपती शाहू महाराज

# १५० सुवर्ण महोत्सवी जयंती सोहळा



# संदर्भाचे भांडार 'शाहू संशोधन केंद्र'

- २७६० दुर्मिळ ऐतिहासिक ग्रंथ, १०३८ साप्ताहिके
- इतिहास, सामाजिकशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र पीएच. डी. पूरक संदर्भग्रंथ
- आतापर्यंत २ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी केला अभ्यास



## संशोधनाचा दर्जा वाढला

संशोधन व शिक्षणावर विद्यापीठाचा दर्जा ठरत असतो. हा दर्जा वाढवण्यासाठी शाहू संशोधन केंद्राने महत्वाची भूमिका बजावली आहे. आहे. विज्ञान शाखेप्रमाणे शाहू संशोधन केंद्राचे दर्जात्मक संशोधन सातासमुद्रापलीकडे पोहोचले आहे. इंग्रजी भाषेतील ग्रंथ परदेशातील संशोधनासाठी संदर्भग्रंथ म्हणून वापरले जातात. शिवाजी विद्यापीठाच्या यशात शाहू संशोधन केंद्राचे महत्वाचे स्थान आहे.

अहिल्या परकाळे
कोल्हापूर


शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी १९७० साली शाहू संशोधन केंद्राची स्थापना केली. या केंद्रात २ हजार ७६० दुर्मिळ ऐतिहासिक संदर्भग्रंथ तर १ हजार ३८ साप्ताहिके आहेत. या संदर्भग्रंथांचा अभ्यास २ हजारहून अधिक पीएच.डी. अभ्यासकांनी केला आहे. गेल्या चार दशकात छत्रपती शिवाजी महाराज, मराठ्यांचा इतिहास, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, ताराराणी यांच्यासह जवळपास ३६ पुस्तकांची प्रकाशने या केंद्रामार्फत केली आहेत. म्हणूनच संदर्भाचे भांडार म्हणजे शाहू संशोधन केंद्र आहे, अशी ओळख देशभर पोहोचली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, ताराराणी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि मराठ्यांचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा. या महापुरुषांच्या कार्यापासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, या हेतूने शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी शाहू संशोधन केंद्राची स्थापना केली. या केंद्राचे पहिले समन्वयकही डॉ. पवार होते. त्यांनी राज्य पुरातत्व विभाग, लंडन येथील इंडिया ऑफिस लायब्ररी येथून हजारो मूळ कागदपत्रे जमा केली. या कागदपत्रांतून सन १९७८ मध्ये 'राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स' या साहित्य मालेतील पहिला खंड संपादित करून इंग्रजी भाषेत प्रकाशित केला. त्यानंतर दुसरे समन्वयक समाजशास्त्र अभ्यासक डॉ. विलास संगवे यांनी १९८३ ते २००६ पर्यंत 'राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स'चे आठ खंड संपादित करून प्रकाशित केले. २००७ पासून डॉ. जयसिंगराव पवार आजतागायत केंद्राचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. डॉ. पवार यांनी २०१० मध्ये प्रो. लठ्ठेकृत शाहू चरित्र व लाटकरशास्त्री शाहू चरित्र संपादित केले. महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवानिमित्त 'महाराष्ट्राच्या इतिहासाची मांडणी आणि पुनर्मांडणी' या विषयावर तज्ज्ञांची गोलमेज परिषद एप्रिल २०११ मध्ये घेतली. कोल्हापूरचा पंचखंडात्मक इतिहास पाच खंड प्रकाशित केले जाणार आहेत. यामध्ये 'कोल्हापूर ऐतिहासिक व भौगोलिक' हा खंड तयार असून प्रकाशनाच्या प्रतीक्षेत आहे. कोल्हापूर सामाजिक, कोल्हापूर सांस्कृतिक भाग-१, कोल्हापूर सांस्कृतिक भाग-२, कोल्हापूर कृषी, औद्योगिक व सहकार प्रत्येकी १ हजार १०० प्रती प्रकाशित केल्या जाणार आहेत. शाहू संशोधन केंद्राची धुरा ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार सांभाळत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली येथील जिर्ण ग्रंथांची पुन्हा प्रिंटींग केली असून ती विद्यार्थ्यांच्या अभ्यासाला पूरक ठरत आहेत.

आधुनिक महाराष्ट्राचा अभ्यास करण्यासाठीची पूरक ग्रंथसंपदा शाहू संशोधन केंद्रात आहे. ऐतिहासिक संदर्भासाठी देश-विदेशातून संशोधक येथे येतात. संदर्भग्रंथांचा अभ्यास करून आपल्या संशोधनाचा निष्कर्ष काढतात. इतिहास अभ्यासक डॉ. आप्पासाहेब पवार यांनी ज्या हेतूने या केंद्राची स्थापना केली- तो हेतू सफल झाल्याचे चित्र आहे. ऐतिहासिक नोंदीचा अमूल्य ठेवा या केंद्रात जपून ठेवला आहे. हा ठेवा संशोधकांना वरदान ठरत आहे.

### केंद्रातर्फे ३६ पुस्तकांचे प्रकाशन

'श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र', 'श्रीशाहूंचे चरित्र', 'महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी', 'डॉ. बाळकृष्ण : चरित्र, कार्य व आठवणी', 'श्रीमत् क्षात्रजगद्गुरू : विचारदर्शन भाग-१', 'राजर्षी छत्रपती शाहूंची ओळख', 'ग्रँहमचा सांख्यिकीय अहवाल', 'डॉ. बाळक्रिशननस् शिवाजी द ग्रेट भाग -१', 'डॉ. बाळक्रिशननस् शिवाजी द ग्रेट भाग-२', 'डॉ. बाळक्रिशननस् शिवाजी द ग्रेट भाग-३', 'डॉ. बाळक्रिशननस् शिवाजी द ग्रेट भाग-४', 'महान शिवाजी-१', 'महान शिवाजी-२', 'ताराबाईकालीन कागदपत्रे खंड-१', 'ताराबाईकालीन कागदपत्रे खंड-२', 'ताराबाईकालीन कागदपत्रे खंड-३', 'जिजाबाईकालीन कागदपत्रे', 'शिवचरित्र एक अभ्यास: सेतुमाधवराव पगडी', 'प्रेषित राजर्षी शाहू छत्र', 'शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे : धनंजय कीर', 'शिवशाही पोर्तुगीज कागदपत्रे : स. शं. देसाई', 'श्री करवीर माहात्म्य डॉ. जी. व्ही. तगारे' आदी ३६ पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले आहे.



### दक्षिण महाराष्ट्रातील एकमेव केंद्र

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, सामाजिक इतिहासाची साधने शाहू संशोधन केंद्रात उपलब्ध आहेत. या केंद्रातील संदर्भग्रंथांचा अभ्यास करण्यासाठी देशविदेशातील संशोधक येतात. इतिहास अभ्यासकांसाठी येथील ग्रंथ, कागदपत्रे वरदान ठरत आहेत. शाहू संशोधन केंद्र दक्षिण महाराष्ट्रातील एकमेव आहे.

-डॉ. जयसिंगराव पवार
(ज्येष्ठ इतिहास संशोधक)

26 JUN 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीचे शिक्षण चार वर्षांचे

## आवश्यकतेनुसार अभ्यासक्रम निवडण्याची संधी




बदलते उच्च शिक्षण
भाग-२

■ संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २५ : बहुविद्याशाखीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन आणि चार वर्षांची पदवी मिळणार आहे. त्यामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या कालावधीचा अभ्यासक्रम निवडता येणार आहे. नवसंशोधन करण्यासह त्यांना आंतरविद्याशाखीय शिक्षणही घेता येणार आहे.

शिवाजी विद्यापीठाने प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एक वर्ष मुदतीचा), पदविका (दोन वर्षे), पदवी अभ्यासक्रमाचे (तीन आणि चार वर्षे) शिक्षण देण्याची तयारी केली आहे. या अभ्यासक्रमाची त्यांना क्रेडिटसह (श्रेयांक) आवश्यक कालावधीसाठी निवड करता येणार आहे. या अभ्यासक्रमात इंटर्नशिप, अॅप्रेंटिसशिपचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी निवडलेल्या पदवी अभ्यासक्रमातील तीन वर्षे उत्तीर्ण झाल्यानंतर शेवटच्या चौथ्या वर्षी त्यांना ऑनर्स अथवा संशोधनाची पदवी मिळविता येणार आहे. चार वर्षांच्या कालावधीच्या अभ्यासक्रमातील एक वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांचे प्रमाणपत्र, दोन वर्ष झाल्यानंतर पदविका आणि तीन वर्षांनी पदवी, तर चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ऑनर्स पदवी मिळणार आहे. या अभ्यासक्रमांसाठी चॉईस बेस्ड क्रेडिट सिस्टीम आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक उपक्रम, पर्यावरण शिक्षण, शाश्वत विकास, मूल्य शिक्षण, एनसीसी, एनएसएस आदींचा अभ्यास करता येणार आहे. संकल्पनांवर आधारित असलेले शिक्षण त्यांना मिळणार आहे.

### विद्यापीठ अधिविभागांमधील प्रवेशित विद्यार्थी




### विद्यार्थ्यांना काय करावे लागणार ?

■ तीन किंवा चार वर्षे कालावधीच्या बहुविद्याशाखीय अभ्यासक्रमात प्रमुख अथवा मुख्य विषय, उपविषय (संबंधित विषय प्रमुख विषयाच्या शाखेतील असू नये. तो अन्य शाखेमधील असावा.), खुले वैकल्पिक अभ्यासक्रम (पदवीच्या पहिल्या दोन वर्षांसाठी), व्यावसायिक व कौशल्य विकास आणि क्षमता संवर्धनासाठीचा अभ्यासक्रम (पदवीच्या प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाकरिता) निवडावा लागणार आहे. त्यांनी प्रमुख विषयाशी संबंधित अथवा पूरक क्षेत्र प्रकल्पही करायचा आहे. चार वर्षांच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना द्वितीय, तृतीय वर्षामध्ये उद्योग, संशोधन संस्थेत चार आठवड्यांचे प्रशिक्षण पूर्ण करावे लागणार आहे.

> राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थी केंद्रित, कौशल्य आधारित आणि बहुशाखीय शिक्षण देणारे आहे. त्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाने मानव्यविद्या शाखेतील १४, विज्ञान व तंत्रज्ञानमधील १८ आणि वाणिज्य व व्यवस्थापनातील ४ असे विविध ३६ अभ्यासक्रम तयार केले आहेत. या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत प्राचार्य, शिक्षकांना मार्गदर्शन केले आहे.
>
> **- डॉ. एम. एस. देशमुख,**
> अधिष्ठाता, मानव्यविद्याशाखा

**कधीही प्रवेश, कधीही बाहेर पडता येणार**

या चारवर्षीय बहुविद्याशाखीय पदवी अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना कधीही प्रवेश घेण्याचा आणि बाहेर पडण्याचा पर्याय विद्यापीठाकडून उपलब्ध करून दिला आहे. सात वर्षांच्या कालावधीमध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता येणार आहे.